**ठळक बातम्या**

- आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम
- ‘राज्यव्यापी एचपीव्ही लसीकरण’ मोहिमेचा आज प्रारंभ
- पश्चिम आशियातल्या संघर्षग्रस्त प्रदेशातून आतापर्यंत ५२ हजारापेक्षा जास्त भारतीय नागरिक सुरक्षितपणे मायदेशी परतले
- भारताचा लक्ष्य सेन ऑल इंग्लंड ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल

**आणि**

- टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना आज अहमदाबादमधे भारत आणि न्यूझीलंडमधे रंगणार

**<><><><><>**

जागतिक महिला दिन आज साजरा होत आहे. या दिनाची यंदाची संकल्पना “सर्व महिला आणि मुलींसाठी हक्क, न्याय आणि कृती” अशी आहे. जागतिक स्तरावर महिला अधिकारांचं बळकटीकरण,न्याय सुनिश्चितीकरण आणि लिंगसमभावाच्या दिशेनं वेगवान वाटचालीची आवश्यकता यावर भर देण्यात येत आहे.

महिला दिनानिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम होत आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. महिला या समाजाच्या आधारस्तंभ असून जर महिला सुशिक्षित, स्वावलंबी आणि सक्षम असतील तर त्या देशाला समृद्ध आणि प्रगतिशील बनवण्यासाठी मोठे योगदान देऊ शकतात असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

महिलांच्या आंतरिक शक्तीमुळे आणि धडाडीच्या वृत्तीमुळे त्यांच्या कुटुंबांचं, समाजाचं आणि देशाचं भवितव्य घडत असल्याचं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

देशाच्या नारीशक्तीच्या कामगिरीचा देशाला अभिमान असून देशाच्या प्रगतीत त्यांच्या परिवर्तनकारी भूमिकेचा मोठा वाटा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही जागतिक महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**छत्रपती संभाजी नगर** इथं आज केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते महिलांसाठी विशेष अस्मिता लीग स्पर्धांचं उद्घाटन झालं. तसेच महिलांसाठी वॉकेथॉन आणि सायकल स्पर्धाना त्यांनी हिरवा झेंडा दाखवला. **धुळे तसेच यवतमाळ** मध्ये देखील आज अस्मिता महिला लीग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती . केंद्र सरकारच्या मेरा युवा भारत, खेलो इंडिया , जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,राष्ट्रीय सेवा योजना, भारत स्काऊट - गाईड कार्यालय तसेच राष्ट्रीय छात्रसेना यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

**छत्रपती संभाजीनगर** जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी महिलांची दुचाकी फेरी काढण्यात आली. औरंगपुरा भागातल्या महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यांना अभिवादनही करून जिल्हाधिकारी कार्यालयात फेरीचा समारोप झाला.

जागतिक महिला दिनानिमित्त **तुळजापूर** इथं श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान आणि आरोग्य विभागाच्या वतीने महिला कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर सुरू आहे.

महिला दिनानिमित्त **गोंदिया** जिल्ह्यात आज पारंपरिक नऊवारी साड्या नेसून महिलांनी सायकल फेरी काढली होती. त्याशिवाय महिलांच्या बाईक फेरीचंही आयोजन करण्यात आलं होतं.

**नवी मुंबईत** महिला मिनी मॅरेथॉन आयोजित करण्यात आली. विविध वयोगटातील तेराशेहून अधिक महिला यामध्ये सहभागी झाल्या होत्या.

भाईंदरजवळ उत्तनच्या रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत महिला लोकप्रतिनिधींसाठी एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज त्याचं उद्घाटन केलं. त्यानंतर वार्ताहरांशी बोलताना ते म्हणाले.

**...होल्ड- बाईट- मुख्यमंत्री- - -**

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं सुमारे साडेतेहतीस हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं लोकार्पण तसंच पायाभरणी झाली.

अठरा हजार तीनशे कोटी रुपये खर्चाच्या दिल्ली मेट्रो योजने अंतर्गत दोन मेट्रो मार्गिकांचाही यात समावेश आहे.

दिल्लीच्या सरोजिनीनगर परिसरात बांधलेल्या जीपीआरए वसाहतीला भेट देऊन आज प्रधानमंत्री मोदी यांनी महिला अर्जदारांना त्यांच्या सदनिकेच्या किल्ल्या सुपूर्द केल्या.

केंद्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या महिला लाभार्थ्यांशी प्रधानमंत्र्यांनी आज संवाद साधला.

<><><><><>

राज्यशासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे १४ ते १५ वर्ष वयोगटातल्या मुलींसाठी ‘राज्यव्यापी एचपीव्ही लसीकरण’ मोहिमेचा प्रारंभ आज होत आहे. राज्यातील एकूण ९ लाख ८४ हजार ४१४ मुलींना या मोहिमेचा लाभ मिळणार असून लसीकरण पूर्णपणे मोफत आणि पालकांच्या संमतीने ऐच्छिक स्वरूपात होणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, महानगरपालिका रुग्णालये आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत लसीकरण केलं जाईल. सर्व लाभार्थ्यांची नोंदणी आणि प्रमाणपत्र वितरण केंद्र शासनाच्या U-WIN या डिजिटल पोर्टलद्वारे करण्यात येणार आहे.

जिल्हास्तरावरही या मोहिमेचा प्रारंभ आज होत असून लातूर जिल्ह्यात १४ वर्षे वयाच्या सुमारे २० हजार ६७१ मुलींना ‘गार्डासिल-४’ लस मोफत देण्यात येणार आहे.

<><><><><>

पश्चिम आशियामध्ये युद्ध सुरू झाल्यानंतर आखाती प्रदेशातून आतापर्यंत ५२ हजारापेक्षा जास्त भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे मायदेशी परत आणल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. भारत सरकारचं पश्चिम आशिया आणि आखाती प्रदेशातल्या घडामोडींकडे बारकाईनं लक्ष असून, विशेषतः अल्पकालीन भेटी दरम्यान आखाती देशांमध्ये अडकलेल्या भारतीय नागरिकांना मायदेशी परत आणण्यावर भर दिला जात असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं. आखाती देशांमधलं हवाई क्षेत्र

अंशतः खुलं करण्यात आल्यामुळे येत्या काही दिवसांमध्ये विमानाच्या आणखी फेऱ्या पाठवून सर्व भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे मायदेशी आणलं जाईल असं ते म्हणाले.

दरम्यान, आखाती देशांमधल्या सर्व भारतीय नागरिकांनी स्थानिक प्रशासनानं जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचं, तसंच तिथल्या भारतीय किंवा वाणिज्य दूतावासानं जारी केलेल्या सूचनांचं पालन करावं अशी सूचना परराष्ट्र मंत्रालयानं दिल्याचं त्यांनी सांगितलं. सीबीएसईने या प्रदेशात येत्या ९, १० आणि ११ मार्च रोजी होणाऱ्या बारावीच्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. येत्या १० मार्च रोजी एकूण परिस्थितीचा आढावा घेतला जाईल आणि १२ मार्च पासून सुरु होणाऱ्या परीक्षांबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल, असं सीबीएसई नं जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेच्या संपर्कात रहावं आणि अधिकृत घोषणांचं पालन करावं असं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षग्रस्त परिस्थितीमुळे दिल्ली आणि मुंबई इथल्या विमानतळांवर आज १०० पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय विमान उड्डाणं रद्द करण्यात आली. त्यामुळे पश्चिम आशियातल्या काही देशांमध्ये जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमान सेवांच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो, याची प्रवाशांनी नोंद घ्यावी असं विमानतळ प्राधिकरणानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या तणावामुळे देशात इंधनाचा तुटवडा निर्माण झाल्याच्या बातम्या निराधार असून केंद्र सरकार हा विषय समर्थपणे हाताळत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. भाईंदर इथं रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत एका कार्यशाळेच्या उद्घाटनानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

- **- होल्ड- बाईट- मुख्यमंत्री - -**

- **<><><><><>**

पश्चिम आशियामधल्या अस्थिर परिस्थितीमुळे, जागतिक बाजारातली वाढती जोखीम लक्षात घेता, चालू महिन्यात शेअर बाजारात परदेशी गुंतवणूकदारांनी विक्रीवर भर दिल्याचं सेबीच्या अहवालात म्हटलं आहे. गेल्या ४ व्यापारी सत्रांमध्ये परदेशी गुंतवणूकदारांनी २१ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी काढून घेतला. मात्र, त्याच वेळी भारतीय रोखे बाजारात

८५५ कोटी रुपयांची परदेशी गुंतवणूक झाली. त्यामुळे  भारतीय भांडवली बाजारातून बाहेर पडलेला निधी  २० हजार ८१९ कोटी रुपयांवर पोहोचल्याचं यात म्हटलं आहे.

गेल्या महिन्यात परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात २२ हजार ६१५ कोटी रुपये गुंतवले होते.

- <><><><><>

भारताच्या लक्ष्य सेननं ऑल इंग्लंड ओपन बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. काल झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात लक्ष्यने कॅनडाच्या व्हिक्टर लाय याचा २१-१६, १८-२१, २१-१५ असा पराभव केला. आज या स्पर्धेच्या अंतिम फेरीत लक्ष्यचा सामना चीनी तैपेईच्या लीन चून ई याच्यासोबत होणार आहे. भारतीय वेळेनुसार संध्याकाळी पाच वाजता हा सामना होईल.

- //<><><><><>//